# <u>जाहिरात</u>

## <u>प्राध्यापक आणि सहयोगी प्राध्यापक,</u>

## <u>शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,</u>

## <u>महाराष्ट्र शासन, गट-अ</u>

**जाहिरात क्र. ०१/२०१५**

महाराष्ट्र शासनाने **शासन निर्णय क्रमांक-एलईसी-१४१४/प्र.क्र.१५८/वैसेवा-३, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई ४०० ००१, दि. १५ जुलै, २०१४** अन्वये वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अधिनस्त शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामधील **सहयोगी प्राध्यापक (गट-अ) व प्राध्यापक (गट-अ) हि राजपत्रित पदे स्वतंत्र निवड मंडळामार्फत** भरण्याचा निर्णय घेतला आहे. सदर शासन निर्णयानुसार महाराष्ट्र शासनाच्या आस्थापनेवरील **प्राध्यापक आणि सहयोगी प्राध्यापक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, महाराष्ट्र वैद्यकीय शिक्षण व संशोधन सेवा, गट-अ अंतर्गत खालील नियमित पदांसाठी** ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. या पदासाठी पात्रता व अर्हताधारक उमेदवार अर्ज करु शकतात.

**२. उपलब्ध पदसंख्या :-**

- **पद- प्राध्यापक**

| अ.क्र. | विषय | एकूण पदसंख्या | खुला | मागास | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इमाव | विमाप्र |
| १. | शरीररचनाशास्त्र | १ | - | - | - | १* | - | - | - | - | - |
| २. | शरीरक्रियायशास्त्र | १ | - | - | - | १* | - | - | - | - | - |
| ३. | विकृतीशास्त्र | २ | - | - | १* | - | - | - | - | १* | - |
| ४. | सुक्ष्मजीवशास्त्र | २ | - | १* | - | १* | - | - | - | - | - |
| ५. | न्यायवैद्यकशास्त्र | २ | - | - | १* | - | - | - | - | १* | - |
| ६. | नेत्रशल्यचिकित्साशास्त्र | २ | - | - | १* | १* | - | - | - | - | - |
| ७. | कान,नाक व घसाशास्त्र | २ | - | १* | - | १* | - | - | - | - | - |
| ८. | औषधवैद्यकशास्त्र | ३ | १ | - | १* | १ | - | - | - | - | - |
| ९. | बालरोगचिकित्साशास्त्र | २ | १ | - | - | १ | - | - | - | - | - |
| १०. | नवजात शिशुरोगशास्त्र | १ | १ | - | - | - | - | - | - | - | - |
| ११. | बधिरीकरणशास्त्र | १ | - | - | १* | - | - | - | - | - | - |
| १२. | अस्थिव्यंगोपचारशास्त्र | १ | - | १* | - | - | - | - | - | - | - |
| १३. | क्षयरोगशास्त्र | ३ | १ | - | १* | १* | - | - | - | - | - |
| १४. | मनोविकृतीशास्त्र | ४ | १ | १* | १* | १* | - | - | - | - | - |
| १५. | त्वचा व गुप्तरोगशास्त्र | ३ | - | १* | १* | १* | - | - | - | - | - |
| १६. | रेडीओथेरपी | २ | १ | १* | - | - | - | - | - | - | - |
| १७. | हृदयरोगचिकित्साशास्त्र | १ | - | १* | - | - | - | - | - | - | - |
| १८.. | गॅस्ट्रोएंट्रोलॉजी | १ | १ | - | - | - | - | - | - | - | - |
| १९. | मुत्रशल्यचिकित्साशास्त्र | १ | १ | - | - | - | - | - | - | - | - |

*** अनुशेषाची पदे**

- **पद- सहयोगी प्राध्यापक**

| अ. क्र. | विषय | एकूण पदसंख्या | अमागास | मागास | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अ.जा. | अ.ज | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इमाव | विमाप्र |
| १. | शरीररचनाशास्त्र | ८ | ४ | १ | १ | - | - | - | - | २ | - |
| | | १ (नि.अ.व्य) | १ खेळाडू | - | - | - | - | - | - | - | - |
| २. | शरीरक्रियाशास्त्र | १० | ५ | - | २ | १* | १* | १ | - | - | - |
| | | १ (नि.अ.व्य) | १ खेळाडू | | | | | | | | |
| ३. | जीवरसायनशास्त्र | ९ | २ | ३* | १* | - | - | - | - | २ +१* | - |
| | | १ (नि.अ.व्य) | २ महीला | १ महीला | - | - | - | - | - | - | |
| ४. | न्यायवैद्यकशास्त्र | ५ | २ | - | - | १ | - | १ | - | १ | - |
| | | १ (नि.अ.व्य) | २ महीला | - | - | - | - | - | - | - | - |
| ५. | औषधशास्त्र | ७ | ५ | १ | - | - | - | १ | - | - | - |
| | | | २ महीला<br>१ खेळाडू | - | - | - | - | - | - | - | - |
| ६. | शल्यचिकित्साशास्त्र | ९ | २ | १ +2* | - | १* | १ | - | - | १* | १ |
| | | १ (नि.अ.व्य) | २ महीला | १ महीला | - | - | - | - | | १ महीला | - |
| ७. | स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र | ७ | ६ | - | - | - | - | - | - | - | १ |
| | | १ (नि.अ.व्य) | १ खेळाडू | - | - | - | - | - | - | - | - |
| ८. | बालरोगचिकित्साशास्त्र | १४ | ७ | १ | १* | १ | - | - | - | ४ | - |
| | | १ (नि.अ.व्य) | - | १ महीला | - | - | - | - | - | १ महीला | - |
| ९. | मनोविकृतीशास्त्र | २ | २ | - | - | - | - | - | - | - | - |
| | | १ (नि.अ.व्य) | १ महीला | - | - | - | - | - | - | - | - |
| १०. | बधिरीकरणशास्त्र | ८ | ४ | - | १ | - | - | - | - | २ | १ |
| | | | १ खेळाडू | | | | | | | | |
| ११. | क्षयरोगचिकित्साशास्त्र | २ | १ | १ | - | - | - | - | - | - | - |
| | | १ (नि.अ.व्य) | | | | | | | | | |
| १२. | मज्जातंतूशल्यचिकित्साशास्त्र | १ | - | १ | - | - | - | - | - | - | - |
| | | | - | - | - | - | - | - | - | - | |

*** अनुशेषाची पदे (नि.अ.व्य.- निसमर्थ असलेली व्यक्ती)**

**२.१** वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये बदल होण्याची शक्यता आहे.

**२.२** वि.जा. (अ), भ.ज. (ब), भ.ज. (क), व भ.ज. (ड) साठी आरक्षित पदे आंतरपरिवर्तनीय असून वि.जा. (अ), चा योग्य उमेदवार उपलब्ध न झाल्यास शासन आदेशानुसार सदर पद भ.ज. (ब), भ.ज. (क), किंवा भ.ज. (ड) मधून आंतरपरिवर्तनीयतेच्या नियमाने गुणवत्तेनुसार भरण्यात येईल.

**२.३** विचारधीन पदांमध्ये अपंगांसाठी पद आरक्षित नसले तरी, शासन निर्णय क्रमांक एमईएस-१२०२/(८१)वैसेवा-१, दि. १९.०८.२००५ नुसार तसेच शासन निर्णय क्र. न्यायप्र-२००९/प्र.क्र.९/सुधार-३, दि. १३.०८.२००९ च्या अनुषंगाने १ (अंधत्व किंवा क्षीणदृष्टी) (Blindness or Low Vision), २ चलनवलन विषयक विकलांगता व मेंदूचा अर्धांगवायू ( Locomotor Disability or Cerebal Palsy) असे अपंगत्व असलेले उपरोक्त वर्गवारीतील उमेदवार प्रस्तुत पदासाठी पात्र आहेत.

**३. वेतनश्रेणी :** प्राध्यापक -रु. ३७,४०००-६७,०००/- आणि ग्रेड पे रु. १०,०००/- व इतर भत्ते.

सहयोगी प्राध्यापक -रु. ३७,४०००-६७,०००/- आणि ग्रेड पे रु. ९,०००/- व इतर भत्ते.

**४. पात्रता:**

**४.१** उमेदवार भारतीय नागरिक असावा.

४.२ प्राध्यापक पदासाठी वय- दिनांक १ एप्रिल, २०१५ रोजी अमागास प्रवर्गाकरिता ५० वर्ष व मागास प्रवर्गाकरिता ५५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

सहयोगी प्राध्यापक पदासाठी वय- दिनांक १ एप्रिल, २०१५ रोजी अमागास प्रवर्गाकरिता ४५ वर्ष व मागास प्रवर्गाकरिता ५५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

४.३ प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक ह्या पदांकरिता महाराष्ट्र शासनाच्या सेवेत नियमित पणे नियुक्ती झालेल्या व कार्यरत उमेदवारांना उच्च वयोमर्यादा ५५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील.

४.४ वरील क्रमांक ४.३ नुसार नमूद केलेली वयोमर्यादेतील शिथिलक्षमतेची सवलत माजी सैनिक, अपंग व खेळाडू यांना देखील लागू राहील.

४.५ **शैक्षणिक अर्हता** : विस्तृत तपशिल www.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर पहावा.

४.६ **अनुभव** :- अ) **प्राध्यापक**- उमेदवाराने संबंधित विषयात भारतीय आयुर्विज्ञान परिषद मान्यताप्राप्त वैद्यकीय महाविद्यालय किंवा शैक्षणिक संस्थेत विस्तारित विशेषता किंवा अतिविशेषता यामध्ये सहयोगी प्राध्यापक म्हणून शिकविण्याचा कमीत कमी ३ वर्षांचा अनुभव प्राप्त केलेला असावा.

(Candidate must possess experience of teaching as Associate Professor in the subject concerned for at least 3 years in broad specialties subject or super specialties subject in the Medical College or teaching institution recognized by Medical Council of India)

ब) **सहयोगी प्राध्यापक**- उमेदवाराने संबंधित विषयात भारतीय आयुर्विज्ञान परिषद मान्यताप्राप्त वैद्यकीय महाविद्यालय किंवा शैक्षणिक संस्थेत विस्तारित विशेषता (एम.डी./एस.एस.)यामध्ये सहाय्यक प्राध्यापक म्हणून शिकविण्याचा कमीत कमी ४ वर्षांचा अनुभव प्राप्त केलेला असावा. तसेच डी.एन.बी.उमेदवारांकरीता सहाय्यक प्राध्यापक म्हणून शिकविण्याचा कमीत कमी ५ वर्षांचा अनुभव प्राप्त केलेला असावा.

अतिविशेषोपचार बाबतीत डिएम/ एमसीएच अर्हताप्राप्त उमेदवारांकरीता किमान दोन वर्षे सहाय्यक प्राध्यापक म्हणून संबंधित विषयामध्ये शिकविण्याचा कमीत कमी २ वर्षांचा अनुभव प्राप्त केलेला असावा. तसेच डी.एन.बी. अर्हताप्राप्त उमेदवारांकरीता किमान ३ वर्षाचा सहाय्यक प्राध्यापक पदावरील संबंधित विषयामध्ये नियमित सेवेचा अनुभव असावा.

(Candidate must possess experience of teaching as Assistant Professor in the subject concerned for at least 4 years in the recognized Medical College or teaching institution for board specialties ( MD/MS) and for D.N.B candidate must possess experience of 5 years in concerned subject)

In super specialty subject candidate must possess experience of teaching as Assistant Professor in the subject concerned for at least 2 years in the recognized Medical College or teaching institution for super specialties ( DM/MCh) candidate and for D.N.B candidate must possess experience of 3 years in concerned subject)

५) प्रस्तुत जाहिरातीमध्ये किमान आवश्यक शैक्षणिक अर्हता, अनुभव नमूद केलेला आहे. सदर किमान अर्हता धारण केली आहे, म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलविण्याकरीता पात्र असणार

नाही. जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या आवश्यकतेपेक्षा जास्त असेल आणि अशा सर्व उमेदवाराच्या मुलाखती घेणे सोईस्कर नसल्यास किमान शैक्षणिक अर्हता आणि / अनुभव याऐवजी जादा शैक्षणिक अर्हता / अनुभव यांच्या आधारे निकष निश्चित करुन मुलाखतीस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल. प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरतीसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. सर्व उमेदवारांना सूचित करण्यात येते की, अर्ज करण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशिलासाठी www.mahaonline.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे अवलोकन करावे. वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

६) **कर्तव्ये व जबाबदाऱ्या :-** प्रस्तुत पदाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या तपशील www.mahaonline.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

७) **शुल्क :-** १) अमागास -रु. ६१५/- (अधिक रु.६० बँक फी)
२) मागासवर्गीय - रु. ४१५/- (अधिक रु.६० बँक फी)

८) **अर्ज करण्याची पध्दत:-**

८.१ अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारला जाणार नाही.

८.२ पात्र उमेदवाराने www.mahaonline.gov.in या वेबसाईटवर दिनांक ०८/०५/२०१५ ते २८/०५/२०१५ या कालावधीमध्येच ऑनलाईन (Web-based) अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अर्ज करण्याची अंतिम वेळ संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत राहील.

८.३ अर्ज भरण्याच्या प्रक्रियेची सविस्तर माहिती www.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

८.४ उमेदवाराने विहित पध्दतीने अर्ज सादर करुन चलनाद्वारे स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेत दिनांक २९.०५.२०१५ पूर्वी शुल्क भरणे आवश्यक आहे. सदर निर्धारित दिनांकानंतर शुल्क स्विकारले जाणार नाही तसेच कोणत्याही परिस्थितीत भरणा केलेले शुल्क परत केले जाणार नाही.

८.५ विहित मुदतीत शुल्क भरणा केलेल्या उमेदवारांची यादी नजिकच्या कालावधीमध्ये www.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.मात्र सदर यादीत नांव समाविष्ट आहे म्हणून संबंधित उमेदवार मुलाखतीसाठी पात्र आहे असे समजण्यात येऊ नये.

८.६ मुलाखतींचा तपशिलवार कार्यक्रम www.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. मुलाखती बाबत उमेदवारास कोणत्याही पत्रव्यवहाराद्वारे कळविले जाणार नाही.

८.७ उमेदवाराने निर्धारित दिनांक, वेळ व ठिकाणानुसार स्वखर्चाने मुलाखतीस उपस्थित राहणे आवश्यक आहे.

८.८ मुलाखतीच्या वेळी उमेदवारांने सर्व आवश्यक मुळ कागदपत्रे व त्यांच्या सांक्षांकित प्रतीचे दोन संच सादर करणे आवश्यक आहे.मूळ कागदपत्रे सादर करु शकत नसलेल्या उमेदवाराची मुलाखत घेतली जाणार नाही.

८.९ आरक्षणाचा दावा सादर केलेल्या उमेदवारांनी मूळ जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र तसेच आवश्यकतेनुसार नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. महिला आरक्षणाकरिता नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

८.१० उमेदवाराकडे त्याची ओळख पटविण्यासाठी आधार कार्ड / ड्रायव्हिंग लायसन्स किंवा तत्सम छायाचित्र असलेला पुरावा असणे आवश्यक आहे. शासकीय कर्मचारी त्यांचे शासकीय ओळखपत्र देखील सादर करु शकतात.

८.११ मुलाखतीच्या वेळी उमेदवाराकडे मोबाईल फोन अथवा तत्सम इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधन असून नये.

८.१२ उमेदवाराने चुकीची किंवा असत्य माहिती सादर केल्याचे निदर्शनास आल्यास त्यास निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरविले जाईल.

८.१३ सदर निवडप्रक्रियेच्या वरिल निर्धारित कार्यक्रमात सुधारणा / बदल करण्याचा हक्क शासन राखून ठेवत आहे.

**ठिकाण : मुंबई**

**दिनांक : ७ / ४ /२०१५**

**डॉ. टि.पी.लहाने**
**सदस्य सचिव-निवड मंडळ**
**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये,**
**मंत्रालय, मुंबई.**